# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट ३८०-२०२४** **दिनांक :- ११/१०/२०२४**

सर्व प्रसारमाध्यमांचे प्रतिनीधी यांना कळविण्यात येते की, दि. ११.१०.२०२४ रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्गत नवीन बोळींज पोलीस ठाण्याचे उद्घाटन सोहळा दुपारी ०४.०० वाजता ऑनलाईन पद्धतीने संपन्न झाला आहे.

दि. ०१/१०/२०२० पासुन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यान्वित झाले असुन, आयुक्तालया अंतर्गत सुरुवातीला १३ पोलीस ठाणे कार्यान्वित होते व एकुण ०७ पोलीस ठाणे नव्याने निर्माण करणे प्रस्तावित होते. मागील ०३ वर्षांत अनुक्रमे आचोळे, मांडवी, पेल्हार, नायगांव, काशिगाव इ. पोलीस ठाणे कार्यान्वित करण्यात येवून आयुक्तालयातील पोलीस ठाण्यांची संख्या एकुण १८ झालेली आहे. आज पोलीस आयुक्तालयातील १९ व्या पोलीस ठाण्याचे अर्थातच बोळींज पोलीस ठाण्याचे उद्घाटन पार पडले आहे.

विरार व अर्नाळा पोलीस ठाणे हद्दितील वाढते नागरीकरण व गुन्हयांचे वाढते प्रमाण यामुळे मुळ विरार व अर्नाळा पोलीस ठाण्याचे विभाजन होणे आवश्यक होते. सदर विभाजनामुळे विरार व अर्नाळा पोलीस ठाणे अंतर्गत दाखल होणा-या गुन्हयांपैकी सुमारे ५० टक्के गुन्हयांचे विभाजन होईल तसेच विरार व अर्नाळा पोलीस ठाण्यांवरील ताण कमी झाल्यामुळे नागरीकांना किमान वेळेत चांगला प्रतिसाद देणे शक्य होईल.

सदर पोलीस ठाणेकरीता कोकण क्षेत्रविकास व गृहनिर्माण विभाग यांचे मालकीची वाणिज्य ईमारत क्र. २, पहीला मजला भाडे तत्वावर प्राप्त झाला आहे. सदर ईमारतीचा भाडे खर्च हा पोलीस आयुक्त कार्यालयातील शासकीय निधीतुन भागविण्यात येणार आहे. तसेच सदर ईमारतीची डागडुजी, पार्टीशन व फर्निचरबाबतच्या खर्चाकरीता जिल्हा नियोजन समिती, पालघर यांच्याकडून निधी प्राप्त झाला आहे. त्यातुन सदर पोलीस ठाणेकरीता पार्टीशन, फर्निचर, संगणक व तत्सम सुविधा उपलब्ध करुन घेण्यात आल्या आहेत.

**नवीन बोळींज पोलीस ठाण्याची हद्द खालीलप्रमाणे असणार आहे :—विरार(पश्चिम), बोळींज, चिखलडोंगरी, नारिंगी, वायके नगर, मारंबळपाडा, डोंगरे, ज्युली बेट, पुनम नगर, राजीव नगर, पद्मावती नगर, वैतरणा खाडी, तीरुपती नगर, विराट नगर, यशवंत नगर, विठ्ठल नगर, गोकुळ टाउनशिप, रानपाडा गाव, खारोडी, कमाणवाला नगर.**

नमूद पोलीस ठाणे उद्घाटन सोहळा कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा.श्री.देवेंद्र फडणवीस हे ऑनलाईन उपस्थित होते. तसेच मा.डॉ. हेमंत सावरा, लोकसभा सदस्य, पालघर, मा.श्री. हितेंद्र ठाकुर, विधानसभा सदस्य, हे बोळींज पोलीस ठाण्याचे उदघाटन प्रसंगी वेळात वेळ काढून प्रत्यक्ष उपस्थित राहीले. तसेच मा.श्री. अनिलकुमार पवार, आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालीका, मा.श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त मिरा-भाईंदर, वसई-विरार, श्रीमती पौर्णीमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-२, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सहायक पोलीस आयुक्त व इतर पोलीस अधिकारी व अंमलदार हे उपस्थित होते.

तसेच स्थानिक प्रतीष्ठीत नागरीक, पत्रकार बांधव, शांतता कमीटी, मोहल्ला कमीटी तसेच महिला समीती सदस्या हे देखील उपस्थित होते.






उपविभागीय कार्यालय उद्घाटन समारंभ
मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री तथा गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य
प्रमुख अतिथी
मा.ना.श्री. अजित पवार
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.ना.श्री. रविंद्र चव्हाण
प्रमुख उपस्थिती
मा.श्री. क्षितीज ठाकुर
विधानसभा सदस्य
मा.श्री. प्रताप सरनाईक
विधानसभा सदस्य
मा.श्री. क्षितेंद्र ठाकुर
विधानसभा सदस्य
विशेष उपस्थिती
मा.श्रीमती रश्मि शुक्ला (भा.पो.से.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
मा.श्री. अनिलकुमार पवार
मा.श्री. गोविंद बोडके (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी पालघर
आपले विनीत


पोलीस
2024.10.11 16:37